मधुवार्ता

# मधमाश्याही वसाहतीमध्ये ठेवतात 'सामाजिक अंतर'



खरं तर 'कोविड-१९' मध्ये आपण 'सामाजिक अंतर-सुरक्षित अंतर' हा शब्द अनेक वेळा ऐकला आणि प्रत्यक्षात अनुभवलासुद्धा. अर्थात करोनाच नाही तर अनेक आजार असे आहेत, की ते एका व्यक्तीपासून दुसऱ्या व्यक्तीपर्यंत पसरत असतात. इतर प्राण्यांच्या तुलनेत मनुष्यप्राण्याला निसर्गदत्त कुशाग्र बुद्धी लाभलेली तरी संसर्गजन्य आजार टाळण्यासाठी सामाजिक अंतर ठेवले पाहिजे याची त्याला अनेक वेळा जाणीव करून द्यावी लागते. याबाबत अनेकदा विविध माध्यमांतून समाज जागृतीपर जाहिराती द्याव्या लागतात. अलीकडे लहानशा मधमाशीपासून आपण अनेक गोष्टी शिकतोय आणि शिकल्याही पाहिजेत- म्हणूनच मधमाशीला 'मॅनेजमेंट गुरू' म्हटलं जातं.

मधमाशीच्या एका पोळ्यात एक राणीमाशी, २०० ते ४०० नर मधमाश्या आणि २० ते ४० हजार कामकरी माश्या राहतात. एवढ्या मोठ्या कुटुंबाचे स्वास्थ्य चांगले ठेवण्यासाठी त्यांना कोणी सल्लागार नसतो, कोणी याबाबत त्यांना मार्गदर्शन करत नाही किंवा त्यांच्यात कोणी डॉक्टरही नसतो. म्हणूनच की काय, मधमाश्यांनी त्यांच्या वसाहतीमध्ये चांगले आरोग्य राखले जावे म्हणून 'सोशल डिस्टन्सिंग' म्हणजेच सामाजिक अंतर ठेवण्यासाठी एक प्रकारची विशिष्ट कार्यप्रणालीच तयार केली आहे, असे म्हणता येईल. मधमाशीच्या पोळ्यामध्ये राणीमाशी अंडी घालण्याचे काम करते; तर २० दिवसांच्या आतील वयाच्या माश्या वसाहतीमधील लहान अळ्यांची देखभाल तसेच वसाहतीतील इतर सर्व कामे करत असतात. त्यांचा आणि बाहेरच्या वातावरणाचा प्रत्यक्ष संबंध येत नाही. परंतु २० दिवसांपेक्षा जास्त वयाच्या मधमाश्या मात्र वसाहतीच्या बाहेर पडून मध, परागकण तसेच पाणी गोळा करून वसाहतीमध्ये आणत असतात. हे काम करत असताना त्यांचा वसाहतीच्या आरोग्यासाठी घातक ठरू शकणाऱ्या काही जिवाणू- विषाणूंशी संपर्क येतो. बाहेर पडणाऱ्या या मधमाश्यांचा वसाहतीमध्ये राहणाऱ्या मधमाश्यांशी प्रत्यक्ष संपर्क झाला तर त्यांच्या माध्यमातून हे जिवाणू- विषाणू वसाहतीमध्ये मोठ्या प्रमाणात पसरू शकतात. याचाच विचार मधमाश्यांच्या वसाहतीमध्ये काम करताना केला जात असतो. म्हणूनच राणीमाशी तसेच अळ्या, इतर तरुण माश्या या वसाहतीच्या पोळ्याच्या मध्यभागी कार्यरत असतात; तर बाहेर जाऊन काम करण्याऱ्या कामकरी माश्यांचे कार्य पोळ्याच्या बाहेरच्या भागामध्येच चालते. मधमाश्यांना अन्नसाठा शोधणे आणि त्याची माहिती वसाहतीमध्ये द्यावी लागते; ज्यासाठी त्या वेगवेगळ्या प्रकारचे नृत्य करतात. हे नृत्य करत असताना त्यांच्या माध्यमातूनही वसाहतीमध्ये मोठ्या प्रमाणात जिवाणू- विषाणू पसरू शकतात. हे टाळण्यासाठी मधमाश्या पोळ्याच्या मध्यभागी नृत्य न करता बाह्य भागामध्ये नृत्य करतात. त्यामुळे वसाहतीमध्ये जिवाणूंचा प्रसार कमी होतो. वसाहतीमध्ये प्रसार झाला तरी, तो जास्तीत जास्त बाहेरच्या भागामध्ये राहतो आणि मध्यभागामध्ये ज्या अळ्या तसेच तरुण मधमाश्या असतात त्यांचे या संसर्गापासून म्हणजेच संभाव्य आजारांपासून संरक्षण होते.

-थोडक्यात मधमाशी आपली पुढील पिढी टिकविण्यासाठी आणि तिला बाहेरच्या जगातील रोगांपासून संरक्षण देण्यासाठी जी योजना- कार्यपद्धती अवलंबते ती खरोखरच विचार करायला लावणारी आहे. बुद्धिमान मनुष्यप्राण्याने मधमाशीच्या या चांगल्या गुणाचा अवलंब केला तर तोही अनेक आजारांपासून सुरक्षित राहून निरोगी जीवन जगू शकेल.

**(सौजन्य : पूर्वा कृषिदूत परिवार)**